☆☆☆ सद्रक्षणाय खलनिग्रहणाय ☆☆☆

## बुलडाणा जिल्हा पोलीस दल

# सायबर गुन्ह्यापासून मुलींना करा मुक्त!



**बेटी को बचाओ, सायबर गुन्होगारोंसे।**




**प्रकाशक**

**पोलीस अधीक्षक,**
**बुलडाणा जिल्हा पोलीस दल,**
**बुलडाणा**

**मुद्रणस्थळ**

**सौ.रागिणी अभय शास्त्री**
**ओंकार ग्राफिक्स ॲण्ड पब्लिकेशन**
**कृष्णा, शास्त्री मोहल्ला, जालना**
**मो. ९८२२७५०२६, ८००७१७०८०८**

**जनहितार्थ विनामूल्य वितरित**

ही पुस्तिका केवळ एक संदर्भ पुस्तिका असून यातील मजकूर कोणत्याही न्यायालयात अथवा कार्यालयात जशाचा तसा ग्राह्य नाही त्याकरिता संबंधीत पुस्तकाचा / शासन निर्णयाचा संदर्भ घेण्यात यावा.

**अरविंद चावरिया** भा.पो.से.
पोलीस अधीक्षक क़ार्यालय, बुलडाणा

# मनोगत

काळाबरोबर चालताना आपल्याला इंटरनेट, मोबाईल फोन्स, संगणक आणि अनेक डिजिटल उपकरणे आजच्या काळात वापरणे अपरिहार्य आणि गरजेचे झाले आहे. व ते वापरता येणे आवश्यक आहे. तरुण पिढीसाठी तर ते परवलीचा शब्द झाले आहेत. आपल्या आयुष्याचा अविभाज्य घटक झाले आहेत.

सोशल मीडिया तर दुधारी शस्त्र आहे. मात्र प्रत्येक नाण्याच्या जशा दोन बाजू असतात तशा त्यालाही आहेत. त्याच्या सकारात्मक, संरचनात्मक आणि प्रागतिक उपयोगाबरोबरच त्यात नकारात्मक, गुन्हेगारीचे नवे प्रकार निर्माण करण्याची क्षमता असणारे धोकेही आहेतच.

या सर्वांचा वापर सुजाणपणे, परिपक्वतेने आणि संयमाने करण्यासाठी काही गोष्टींचे ज्ञान असणे आणि सावधगिरी कशी बाळगावी ते माहित असणे आवश्यक आहे. त्यासाठीच या मार्गदर्शक पुस्तिकेचे लेखन रंजक आणि सोप्या भाषेत केले आहे.

सर्वांना ते अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल.

**अरविंद चावरिया** भा.पो.से.
पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलडाणा



## अनुक्रमणिका


मोबाईल रिचार्जचे दुकान

डेबिट कार्ड क्लोनिंग

की लॉगर

एसएमएस स्पूफिंग

कॉल स्पूफिंग

खंडणीची नवी पद्धत

सायबर पाठलाग/स्टॉकिंग

छायाचित्रांचा गैरवापर (फोटोमॉर्फिंग)

प्रोफाईल हेकिंग

ऑनलाईन गेम्स

जॉब कॉल लेटर

डीप फेक्स

डेटिंग वेबसाईट

कॅमेरा हॅकिंग

सोशल ट्रोलिंग




## मोबाईल रिचार्जचे दुकान

१ तुमचा मोबाईल फोन रिचार्ज क़रण्याचे दुकान म्हणजे अशी जागा जिथून तुमचा मोबाईल क्रमांक फसवणूक करणाऱ्या भामट्यांना सहज मिळू शकतो कारण तो तुम्ही रिचार्जसाठी दुकानदाराला सांगितलेला असतो.नंतर तुम्हाला कॉल करण्यासाठी किंवा मॅसेज करण्यासाठी हा क्रमांक वापरला जातो.

तुमच्या निष्काळजीपणाचा गैरफायदा घेतला जातो किंवा अगदी तुमचा भावनिक छळही केला जाऊ शकतो.



- आपला मोबाईल फोन ५० रुपयाचे रिचार्ज करण्यासाठी मिना मोबाईलच्या दुकानात गेली




- अखिल नावाचा दुकानदार तिला म्हणाला की सर्व्हर डाऊन असल्याने तो थोड्या वेळाने रिचार्ज करून देईल.




- अर्ध्या तासाने मीनाला मेसेज आला की तिचा फोन ५०० रूपयाने रिचार्ज झाला आहे.



ती ते सांगण्यासाठी दुकानात गेली आई म्हणाली की उरलेले ४५० रूपये देण्यासाठी सध्या तिच्याकडे काही पैसे नाहीत. तो म्हणाला ठिक आहे. पुढच्या वेळी पाहू.




मग अखिलने मीनाला मेसेजेस पाठवायला सुरुवात केली आणि लवकरच त्यांच्यात मैत्री झाली.




अखिलने मीनाकडे आपल्या प्रेमाची कबुली दिली आयुष्यभर साथ देण्याचे वचनही दिले.



आता मीनाला स्वर्ग दोन बोटे उरला आहे. ते त्याच्या बाईकवर फिरायला जातात. तो तिच्यासाठी भेटवस्तू आणतो.



एक दिवस चांगले पटवून अखिलने तिला एका लॉजवर नेले. मग एकाच दिवसानंतर त्याने तिच्याशी असलेले प्रेमाचे नाते तोडले.



त्याने तिला धमकावले की घडलेली घटना तिने कोणाला सांगीतली तर फोटो आणि व्हिडीओ सगळीकडे पसरवेल.

*मीनाला नैराश्य आले.*





## डेबिट कार्ड क्लोनिंग

२ डेबिट कार्ड / ए.टी.एम.कार्डबाबत फसवणूक तेव्हा होते जेव्हा बिन / पासवर्ड दुसऱ्या व्यक्तीकडे उघड केला जातो. फसवणूक करणाऱ्या भामट्याकडे तो पिन / पासवर्ड आणि ते कार्ड अगदी थोड्या वेळासाठी जरी आले तरी तो तसेच दुसरे बनावट कार्ड एखाद्या उपकरण आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करून तयार करू शकतो (क्लोनिंग) आणि पैसे काढून घेऊ शकतो.

- मीनाला रिना या एकाच महाविद्यालयात शिकणाऱ्या मैत्रिणी आहेत



- मीनाचा बॉयफ्रेंड अर्जुनला ड्रग्ज / अमली पदार्थाचे व्यसन आहे




- मीनाला अशी आशा आहे की अर्जुनमध्ये एक दिवस बदल घडेल. मात्र यावर तो नाते तोडण्याची भाषा करत असे आणि सतत पैसे उसने घेत असे.



- मीनाने एकदा रिनाकडे ५००रुपये मागितले आणि रिनाने तिला आपले एटीएम कार्ड आणि पिन दिला.



- मीना १५ मिनिटांनी परत आली आणि खात्यातून ५०० रुपये काढल्याचा मॅसेज रिनाच्या मोबाईल वर आला.




- त्यानंतर एक आठवड्याने खात्यातून ५००० रुपये काढल्याचा मॅसेज रिनाच्या मोबाईलवर आला आणि रिनाला धक्काच बसला.



- ज्या दिवशी मीनाने एटीएम कार्ड नेले त्या दिवशी अर्जुन बाहेर वाट पाहत होता, त्याने ते एटीएम कार्ड नेले.



- त्याने तसेच दुसरे बनावट कार्ड स्कीमिंग उपकरण आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करून तयार केले (क्लोनिंग) आणि त्याला माहित झालेला पिन/ पासवर्ड वापरून आठवड्याभराने त्या खात्यातून पैसे काढले.




- कोणी तुमच्या कितीही जवळचे असले तरीही आपले एटीएम कार्ड आणि पिन कधीही कोणालाही देऊ नका.





# की लॉगर

३

हा एक बेकायदेशीरित्या काम करणारा संगणक कार्यक्रम (कॉम्प्युटर प्रोग्राम) आहे जो सावजाच्या (ज्या व्यक्तीची फसवणूक करावयाची आहे तिच्या) संगणकात टाकला (इन्स्टॉल केला) जातो जेणेकरून तो त्या संगणकातील पासवर्ड आणि अन्य संवेदनशील माहिती चोरतो. की लॉगरच्या साह्याने फसवणूक करणारा संगणकात असणारी लॉगइन बद्दलची माहिती आणि अन्य माहिती गोळा करतो आणि एका विशिष्ट इ मेल वर पाठवतो.


अनुषा आणि पुजा अगदी घट्ट मैत्रिणी आहेत आणि एका ठिकाणी दोघी एकाच खोलीत भाड्याने राहतात. त्या एकाच बहुराष्ट्रीय कंपनीत काम करतात.



एकदा दोघींच्या मैत्रीला ग्रहण लागले कारण दोघी त्यांचा बॉस विवेकच्या प्रेमात पडल्या.



पूजाने अजिबात वेळ न घालवता विवेककडे आपल्या प्रेमाची कबुली दिली आणि त्याने प्रेमाचा प्रस्ताव स्वीकारला. ते एकमेकांना डेट करू लागले.




अनुषाचा भ्रमनिरास झाला. तिने पूजाला धडा शिकवायचे ठरविले.



एक दिवस अनुषाने पूजाच्या संगणकात की लॉकर प्रोग्राम टाकला. त्या स्पायवेअर (गुपचूप माहिती काढून घेणाऱ्या यंत्रणेने) त्या संगणकातील सर्व गोष्टी कॉपी करून एका मेल वर पाठवल्या.




आपले पासवर्ड, फोटो, खासगी गोष्टी, ई मेल आणि इंटरनेटची हिस्टरी हे सगळे आता अनुषाकडेही आहे. हे पूजाला माहितच नाही.




अनुषाने सगळा खासगी संवाद पुजाच्या पालकांना पाठवला आणि त्याचे खासगी फोटो सोशल मीडियावर बनावट अकाउंट तयार करून त्यावर अपलोड केले.



विवेकला याचा धक्का बसला. त्याचे नाते तुटले आणि पूजा अजूनही बावरलेली आहे.



आपला संगणक पासवर्ड ठेऊन नीट लॉक न केल्याबद्दल आणि माहिती सुरक्षित ठेऊ शकणारा एंटी व्हायरस प्रोग्राम न वापरल्याबद्दल पूजाला पश्चात्ताप होतो आहे.






# एसएमएस स्पूफिंग

४

ऑनलाईन खरेदी करताना काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत अन्यथा तुम्ही बनावट वेबसाईटद्वारे होणाऱ्या फिशिंगचे आणि वाईट हेतूने पाठवल्या जाणाऱ्या एसएमएस स्पूफिंगचे बळी ठरू शकता.



- ऐश्वर्याला खरेदीचे अगदी वेडच आहे. अनेक शॉपिंग आणि आर्थिक व्यवहार वेबसाईटसची ती सदस्य आहे.



- कायम ती नवनव्या ऑफर्सची वाट पाहते आणि खरेदी करते. ती रेडीमेबल कुपन्स सुद्धा वापरते.



- एक दिवस तिला वॉलमार्टकडून एक ई मेल आला की तिने ५००० रुपयांची हँडबॅग ५०० रुपयात जिंकल्याबद्दल तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.



- तिला वॉलमार्टकडून एक मॅसेज आला की ती या ऑफर्सचा लाभ दोन वेळा घेऊ शकते मात्र त्यासाठी तिने ऑनलाईन पैसे द्यावे, वस्तू मिळाल्यावर पैसे देण्याचा पर्याय निवडू नये.



- ऐश्वर्या बँकेत गेली तिने १००० रूपये भरले आणि ऑनलाईन व्यवहार केला




- महिना उलटून गेला तरीही त्या वस्तू आल्या नाही. तिने हेल्पलाईनशी संपर्क साधला.



तिला समजले की, ज्या लिंकवरुन ती त्या वेबसाईटवर गेली होती, ती बनावट होती आणि फिशिंग करून मेसेज स्पूफिंद्वारे तिला फसवण्याचा प्रकार घडला होता.



तिला आता कळून चुकले की, जेव्हा असा विश्वास बसणार नाही इतकी सूट देणाऱ्या आकर्षक ऑफर्स असतात तेव्हा सतर्क राहून त्याबद्दल आधी खातरजमा करून घेणे आवश्यक असते.





सध्या नायजेरियन घोटाळे सतत होत आहे.ज्यात कोका कोला कंपनीच्या आयटी विभागाच्या नावाने फसवे मेसेजेस पाठवले जातात आणि लोक त्याला बळी पडतात.





# कॉल स्पूफिंग

५ कॉल स्पूफिंग हे अशा ॲप (**App**) द्वारे केले जाते ज्याने गुन्हेगारी प्रवृत्तीची व्यक्ती एखाद्याचा क्रमांक आणि आवाज बदलून तोतया नावाने कॉल करून फसवते.



शबाना एक विधवा स्त्री आहे. ती तिच्या स्वतःच्या घरात एकटी राहते.




वेळ घालवण्यासाठी ती इंटरनेटचा वापर करते आणि ती सोशल मीडियावर खूपच सक्रीय आहे.



ती सोशल इंजिनिअरींग बद्दल अनभिद्न्य होती. ती सामहीक मित्रांचे फ्रेन्ड रिक्वेस्ट स्विकारत होती.



- एके दिवशी तिला तिच्या मुलाचा शफिकचा फोन आला आणि तो म्हणाला की त्याच्या एका मित्राच्या खात्यावर तात्काळ एक लाख रूपये जमा कर कारण त्याचे खाते बंद झाले आहे अणि त्याने त्या खात्याची माहितीही पाठवली.



- शबानाने मुलाचा क्रमांक पाहिला तो बरोबर होता. त्यानुसार पैसे जमा केले.



- पैसे ट्रान्स्फर झाल्यावर तिने तिच्या मुलाला त्याच्या क्रमांकावर फोन केला आणि रक्कम त्याच्या खात्यात जमा झाली का ते पाहण्यास सांगितले.



तिचा मुलगा शफिक आश्चर्यचकित झाला कारण त्याने त्या आईला फोनच केला नव्हता.



शबानाला कळले की, ती कॉल स्पूफिंगला बळी पडली आहे आणि एका फसवणूक करणाऱ्या भामट्याच्या खात्यात पैसे भरले गेले आहेत.



असे काही वापरुन कोणत्याही क्रमांकावरुन फोन किंवा मेसेज करता येतात आणि असे खोटे कॉल करून भामटे लोकांना फसवतात.





# खंडणीची नवी पद्धत

६ रॅनसमवेअर हे असे नुकसानकारक सॉफ्टवेअर आहे ते एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती उघड करण्याची धमकी पाठवते किंवा संगणक यंत्रणा बंद करून टाकते जोवर मागितेली खंडणीची रक्कम दिली जात नाही. एखाद्या मेल सोबत आलेल्या एटॅचमेंटला डाऊनलोड केल्याने त्याद्वारे आपल्या सिस्टीम मध्ये प्रवेश मिळवून तो सगळ्यांवर नियंत्रण मिळवतो.



- अलिशा ही एक उद्योजिका आहे. तिच्या कंपनीत ५० कर्मचारी कार्यरत आहेत आणि तिथे एकून ६० संगणक यंत्रणा (सिस्टिम्स) आहेत.



- एके दिवशी तिला तिच्या एका व्हेंडरकडून एक ईमेल आला त्यासोबत एक फाईल/एटेचमेंट होती.




- अलिशाने ती एटेचमेंट डाऊनलोड केली, तिचा एन्टीव्हायरस अपडेट नसल्याने धोक्याची कोणतीही सूचना मिळाली नाही.



- ती फाईल उघडल्यावर तिची सिस्टीम करप्ट झाली आणि सगळ्या फाईल्स खराब झाल्या आणि तिला संगणक यंत्रणा वापरता येईना.



- स्क्रीन वर एक मेसेज आला की बीटकॉईन्सच्या स्वरुपात एक लाख रुपये द्यावे तरच तिचे संगणक वापरता येतील.



- दिलेल्या बीटकॉईन वॉलेट एड्रेसवर अलिशाने पैसे भरले.



- मात्र हॅकरने प्रायव्हेट की दिली नाही आणि सगळ्या फाईल्स तशाच करप्ट राहील्या.



- क़ंपनी व्यवस्थापकाने अलिशाला सांगितले की, तिला आलेला ई मेल हा फिशिंग मेल होता आणि तो रॅनसमवेअर पाठवण्यात आला होता.



- मेल डिलीट न केल्याबद्दल आणि एन्टी व्हायरस अपडेट नसल्याबद्दल अलिशाला पश्चात्ताप होऊ लागला.






## सायबर पाठलाग / स्टॉकिंग

७ सायबर स्टॉकिंग म्हणजे इन्टरनेट किंवा अन्य इलेक्ट्रोनिक व्यवस्थेने एखाद्या व्यक्तीवर पाळत ठेवणे आणि तिच्याबद्दल माहिती मिळवून त्याद्वारे तिला त्रास देणे किंवा ती माहिती सोशल मीडियावर पसरवणे.



- जुवेरीया एक अनिवासी भारतीय आहे. तिने आपले शालेय शिक्षण अमेरिकेत पूर्ण केले आणि आता भारतात अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे. ती अगदी दिलखुलासपणे आयुष्य जगणारी मुलगी आहे.



- ती जे काही करते ते सगळे ती सोशल मीडियावर अपलोड करत असते. आणि हो तिचे १० हजाराहून अधिक फॉलोअर्स आहे.




- ती फेसबुकची चेकइन फिचर सेवा वापरते ज्यामुळे ती कुठे आहे काय करते आहे हे तिच्या मित्रमंडळीना आणि फॉलोअर्सना समजत असते. तिच्या आयुष्यात खासगी असे फार कमी आहे.



एक दिवस तिने एकटीने गोव्याला सहलीला जाण्याचे ठरवले. आपली योजना आणि प्रवासाच्या मार्गासह सगळा कार्यक्रम लगेच आपल्या सेशल मीडियावर सांगीतला.




किरण नावाच्या एक स्टॉकर तिच्या सगळ्या हालचालींवर लक्ष ठेऊन होता. तो एक अट्टल भामटा होता आणि नुकताच जामिनावर सुटला होता.



त्याने गोव्याला जाणारी एक बस पकडली आणि तिथे जाऊन आपल्या हॉटेलमधून जुवेरीयाला मेसेज करून भेटण्याची इच्छा व्यक्त केली.




- किरणचे प्रोफाईल पाहताच जुवेरीयाने त्याचे प्रोफाईल ब्लॉक केले. परंतु पुढे काय होणार याची पुसटशी कल्पनाही तीला नव्हती.



- किरण तीच्या कार्यक्रमावर पाळत ठेऊन होता. एकदा त्याने तीला बीचवर गाठले. आसपास कोणी नाही हे पाहून तीच्याशी गैरवर्तन केले व तेथून पसार झाला.



- जुवेरीयाला तीचे फोटो चेकींग डिटेल्स सोशल मिडियावर खासगी न ठेवल्याचा अतोनात पश्चाताप झाला.





## छायाचित्रांचा गैरवापर (फोटो मॉर्फिंग)

८ छायाचित्रात (फोटोत) एका व्यक्तीचा चेहरा दुसऱ्याच्या शरीरावर लाऊन त्याद्वारे ब्लेकमेल केले जाते किंवा अन्य प्रकारे धमकी दिली जाते ज्यायोगे सोशल मीडियावर आपले फोटो पोस्ट करणाऱ्या लोकांना लुबाडले जाते.



- ऐश्वर्या एक १८ वर्षाची मुंबईत राहणारी दिलखुलास मुलगी आहे.





- ती कायम आपले फोटो काढत असते आणि सोशल मीडियावर / इंस्टाग्रामवर अपलोड करत असते तसेच टिकटॉकचे तिला भयंकर वेड आहे.



- तिने पोस्ट केलेल्या प्रत्येक फोटोला तिला हजारो लाईक्स आणि शेकडो कमेंटस् मिळतात.



- एके दिवशी तिला एका अनोळखी मुलाकडून फ्रेंड रिक्वेस्ट आली आणि तिने ती स्वीकारली.



- ती महाविद्यालयात जात असताना त्या मुलाने, आर्यनने तिचा पाठलाग केला आणि तिला प्रपोज केले.




- ऐश्वर्याने त्याला स्पष्ट नकार दिला आणि त्याला रागावली.



- आर्यन त्याच्या घरी गेला आणि तिचे फोटो त्याने डाऊनलोड केले आणि निर्वस्त्र महिलांच्या फोटोवर तिचा चेहरा लाऊन त्याने फोटो मॉर्फिंग केले.



- त्याने ते फोटो आपल्या मित्रांना पाठविले आणि तिच्या फोन क्रमांकासह कोणत्याही वेबसाईटवर पाठवून दिले.



- आपले सगळे फोटो सतत सोशल मीडियावर अपलोड केल्याबद्दल आणि अनोळखी व्यक्तीची फेंड रिक्वेस्ट स्वीकारल्याबद्दल ऐश्वर्याला पश्चाताप होऊ लागला.

